# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्म चिंतन

**डॉ. सुजाता सचिन देशमुख** सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी. ई-मेल- rajshri.sujata13@gmail.com मो. नंबर 913081793

---

**प्रस्तावना:-**

जगाच्या इतिहासात सर्वात महत्त्वाची भूमिका पार पाडली ती 'धर्म' या शब्दाने. सर्व जाती-पाती आज वेगवेगळया धर्माच्या नावाखाली एकवटलेल्या दिसतात. आजच्या समाजात निधर्मी माणूस सापडणे ही खूप दुर्मिळ गोष्ट आहे. धर्माची व्याख्या ही अनेक स्वरूपात अनेक प्रकारे अनेक संत महापुरुषांनी त्यांच्या मतानुसार मांडली आहे. त्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्याख्या ही अभ्यासण्यायोग्य आहे. डॉ.आंबेडकर धर्माविषयी आपले मत मांडताना म्हणतात की "आदिम" धर्मांच्या मानववंशशास्त्रीय अभ्यासाद्वारे आंबेडकरांनी असा युक्तिवाद केला की धर्माच्या सुरुवातीच्या प्रकारांमध्ये देव किंवा नैतिकतेची कोणतीही संकल्पना नाही. ऊन, पाऊस, वारा, रोगराई इ. यांसारख्या निसर्गाच्या प्रेरक शक्तींबद्दल धर्म चिंतित आहे. अशी धर्माची अवस्था असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म एका अस्पृश्य जातीमध्ये झाला. हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व जातीसंस्थेमुळे त्यांना बालपणी अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या, अनेक अपमानकारक व कटू प्रसंगाना सामोरे जावे लागले. या कटू अनुभवांचा खोल परिणाम त्यांच्या व्यकिनत्वावर झाला. पुढे आंबेडकर बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या मदतीने शिक्षणासाठी परदेशी गेले. त्यांनी अनेक अडचणींना तोंड देऊन इ. स.1923 साली नोव्हेंबर महिन्यात लंडन विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी संपादन केली. अस्पृश्य जातीतील एक व्यक्ती डॉक्टर झाली होती; पण समाजाच्या वागणुकीत कोणत्याही प्रकारचा फरक पडलेला नव्हता. जी हीन वागणूक त्यांना पूर्वी मिळत होती. तीच वागणूक त्यांना डॉक्टर झाल्यानंतरही मिळत होत, त्यांना पावलोपावली एक दलित म्हणून अपमान सहन करावा लागत असे, त्यातूनच हिंदू धर्म व हिंदू धर्मातील जातीव्यवस्था याबद्दल त्यांच्या मनामध्ये चिड निर्माण झाली. प्रस्थापित धर्म व्यवस्थेविरूध्द त्यांचे मन बंड करून उठले. हिंदू धर्मात राहून आपल्या दलित बांधवांना मानाचे स्थान मिळवून देणे किंवा त्यांची सर्वांगीण प्रगती साधणे कदापि शक्य नाही असे त्यांना वाटू लागले व ते धर्मांतराच्या विचारापर्यंत येऊन पोहचले. धर्मांतराच्या निर्णयापर्यंत येऊन पोहचण्याआधी त्यांनी धर्म या संकल्पनेवर खूप अभ्यास केला, प्रत्येक गोष्ट बुध्दीच्या कसोटीवर तपासून पाहिली. धर्म म्हणजे काय ? नैतिकता म्हणजे काय ? धर्माचा व नैतिकतेचा संबंध काय? धर्माची जीवनात गरज काय ? किंवा भूमिका काय ? धर्म हा समाजातील एखाद्या समूहाच्या किंवा घटकाच्या पिळवणुकीचे साधन होऊ शकतो का? या सर्व प्रश्नांची उत्तरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शोधू लागले, त्यावरती विचार करू लागले. खूप वाचन, मनन करून धर्मजागृतीसाठी आंबेडकरांनी विपुल साहित्य लेखन केले.

**संशोधन पद्धती:-**

ऐतिहासिक संशोधनात नित्य नवा दृष्टीकोन महत्वाचा असतो. इतिहास संशोधनात समस्येचे अनेक पैलूंचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करणे गरजेचे असते. म्हणून प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये:-**

1. डॉ. आंबेडकरांच्या धर्माविषयीच्या मतांचा अभ्यास करणे.
2. डॉ. आंबेडकरांच्या धर्म सुधारणेसाठीचे योगदान अभ्यासणे.

3) डॉ. आंबेडकरांचा बौद्ध धर्माकडे वाढत गेलेला कल अभ्यासणे..

**संशोधनाची गृहीतके:-**

१) डॉ. आंबेडकरांचे धर्माविषयीचे मत धर्म जागृतीसाठी महत्वाचे ठरले.

२) डॉ. आंबेडकरांचे धर्मसुधारणासाठीचे योगदान मोलाचे ठरले.

३) डॉ. आंबेडकरांचा बौद्ध धर्माकडेचे अधिक कल वाढत गेला.

**संशोधनाची साधने:-**

प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असून त्यात प्रामुख्याने ग्रंथालयातील विविध लेखकांचा संदर्भ ग्रंथाचा, मासिकाचा, वर्तमानपत्रांचा तसेच इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

**अल्पचरित्र : -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म सोमवार दि. 14 एप्रिल 1891 रोजी प्रातः समयी मध्यप्रदेशात 'महू' या गावी झाला. वडील सुभेदार रामजी संकपाळ आणि आई भीमाबाई यांचे हे शेवटचे म्हणजे चौदावे अपत्य होय.[1] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात दापोलीजवळ पाच मैलावर असलेले 'आंबावडे' नावाचे लहानसे खेडे होय. त्यांचे आजोबा मालोजीराव या गावचे रहिवाशी होते.[2] डॉ. बाबासाहेबांचे बालपण काही दिवस दापोली, पुढे सातारा आणि नंतर मुंबई येथे व्यतीत झाले. लहानपणीच आई वारल्यामुळे आत्या मीराबाईने अतिशय प्रेमळपणे त्यांचा सांभाळ केला. त्यांचे प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण सातारा येथे तर महाविद्यालयीन शिक्षण मुंबई येथे पूर्ण झाले. उच्च शिक्षण

अमेरिकेतील न्युयॉर्क मधील कोलंबिया विद्यापीठ आणि इंग्लंडमधील लंडन येथील स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स, लंडन' अशा विश्वविख्यात संस्थामध्ये झाले. शिक्षण घेताना डॉ. बाबासाहेबांचे प्रचंड हाल झाले परंतू अत्यंत प्रतिकूल, खडतर परिस्थितीत १८-१८ तास प्रचंड अभ्यास करून त्यांनी यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली.[3]

**कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव:-**

डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाचा भरपूर प्रभाव होता. कार्ल मार्क्सच्या तत्त्वाचा उल्लेख करून आंबेडकर म्हणाले, 'मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाही. त्याला मन आहे. त्या मनाला विचाराचे खाद्य पाहिजे. धर्म मनुष्याच्या हृदयात आशा निर्माण करतो. त्याला काम करावयास प्रवृत्त करतो. पददलितांच्या उत्साहावर हिंदू धर्माने पाणी ओतले आहे. म्हणून धर्म बदलण्याची आवश्यकता डॉ. आंबेडकरांना वाटली.[4] आपले विचार या देशातील संस्कृती, इतिहास आणि परंपरा यांच्याशी प्रतारणा करणारे नाहीत याचे स्पष्टीकरण देताना ते अगदी कळकळीने म्हणतात, "जर माझ्या मनात द्वेष असता आणि सुडाची भावना असती तर पाच वर्षांच्या आत मी या देशाचे वाटोळे केले असते. हिंदू संस्कृती न सोडण्याविषयी त्यांनी घेतलेली ही खबरदारी किंवा जो धर्म या देशातील प्राचीन संस्कृतीला धोका देईल किंवा अस्पृश्यांना अराष्ट्रीय बनवील असा धर्म मी केव्हाही स्वीकारणार नाही. कारण या देशाच्या इतिहासात विध्वंसक म्हणून स्वतःच्या नावाची नोंद करून घेण्याची माझी इच्छा नाही." असे ते म्हणत.[5]

**धर्माबाबत डॉ. आंबेडकरांचे विचार मंथन:-**

लहानपणापासूनच धर्म म्हणजे काय ? नैतिकता म्हणजे काय ? धर्माचा व नैतिकतेचा संबंध काय ? धर्माची जीवनात गरज काय ? किंवा भूमिका काय ? धर्म हा समाजातील एखाद्या समूहाच्या किंवा घटकाच्या पिळवणुकीचे साधन होऊ शकतो का ? या सर्व प्रश्नांची उत्तरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शोधू लागले, त्यावरती विचार करू लागले. यासाठी त्यांनी धर्म या संकल्पनेवर भरपूर अभ्यास केला. खूप वाचन, मनन व विद्यासाधना केली. हिदू धर्मामध्ये चातुर्वर्ण्य जातीव्यवस्थेच्या नावाखाली दलित समाजाला अक्षरशः चिरडले जात होते.[6] याविरुद्ध डॉ. आबेडकरांचे मन बंड करून उठले. हिंदू धर्मातील बुद्धिप्रामाण्यास विरोध, जातिव्यवस्था, अस्पृश्यतेची प्रथा आणि भयंकर अपसमजुती यामुळे हिंदू धर्माला आलेली विकृती दूर करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी समाजव्यवस्थेत व धर्मात सुधारणा करण्याचा प्रस्ताव जाहीर केला. हिंदू धर्मातील तत्त्वज्ञानच हे मुळत चुकीचे आहे. "उलट जे व्यवहारात्त आहे ते एवढे विकृत आहे, की त्यालाच तात्त्विक रूप देऊन आदर्श मानता येत नाही,"[7] असे आंबेडकर म्हणतात.

**भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म:-**

डौं- बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या 'द वुद्ध अँड हिज धम्म' या मूळ इंग्रजी ग्रंथाचा घनःशाम तळवटकर, म. भि. चिटणीस शा.शं. रेगे यांनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या नावाने मराठी अनुवाद केला आहे. तळवटकर, चिटणीस, रेगे यांनी या ग्रंथाचा मराठी अनुवाद केल्याने बाबासाहेबांचे विचार लाखो मराठी वाचकांच्यापर्यंत पोहोचण्यास मोठी मदत झाली.[8] बुद्ध आणि त्याचा धम्म हा ग्रंथ बाबासाहेबांचा अखेरचा ग्रंथ इ. स. 1956 मध्ये प्रसिद्ध झाला. गौतम बुद्धांच्या चरित्राचा शोध घेताना काही प्रश्न आंबेडकरांच्या मनात होते. सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या परिव्रजा संबंधीचा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अतिशय विस्ताराने लिहितात. या ग्रंथामधून धर्म म्हणजे जगाची निर्मिती कशी झाली तसेच धम्म म्हणजे जगाची पुर्नरचना कशी करावयाची या दोन बाबींची सखोल चर्चा केली आहे. या ग्रंथामध्ये बुद्धाचा जन्म, प्रवज्या, गृहत्याग, ज्ञानाच्या शोधात, ज्ञानप्राप्ती, बुद्ध व त्याचे पूर्वकालीन, बुद्ध व त्याचे समकालीन, साम्य आणि भेद, धम्मदिक्षा, बुद्धाने काय शिकविले, धर्म आणि धम्म, संघाचा आढावा, बुद्धाचे विरोधक व टिकाकाररांना उत्तरे, अंतिम यात्रेचे वर्णन, निकटवर्तीयांच्या भेटी, वैशालीचा निरोप आणि महापरिनिर्वाण बुद्धाचे व्यक्तिमत्त्व, मानवता, आवडनिवड आणि उपसंहाराद्वारे या ग्रंथाचे लिखाण करून बाबासाहेबांनी महानिर्वाणाचा मार्ग पत्करला."[9]

**धर्मांतराची घोषणा:-**

1920 च्या दशकातल्या समाज जीवनातील चळवळी व अनुभव यामुळे डॉ. आंबेडकरांची खात्री होऊ लागली की, हिंदू धर्माच्या जीवन चौकटीमध्ये राहून अस्पृश्यांचा कधीच उध्दार होणार नाही. जर हिंदु धर्माच्या इतर सदस्यांसारखेच हक्क व अधिकार मिळत नसतील, तर त्या धर्माचे सदस्यत्व काय कामाचे? मंदिर प्रवेश सत्याग्रहामध्ये सनातन्यांची व काँग्रेसजनांची भूमिका व मानसिकता पाहून डॉ. आंबेडकरांना वेळोवेळी जाणीव होत होती की, ते हिंदू धर्मासाठी अस्पृश्य व्यक्ती, प्राण्यांपेक्षाही हीन आहे. याच काळात धर्मांतराच्या विचाराचे बीज त्यांच्या मनात मुळ धरू लागले. मे 1940 मध्ये बार्शी येथे भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात, "जो धर्म त्याच्या अनुयायांना ऐहिक आणि पारलौकिक सुखाची द्वारे मोकळी करण्याऐवजी ती बंद करूनच त्यांना अधोगतीत खितपत पडावयास लावतो,[10] त्या धर्माला चिकटून राहण्यात काय अर्थ आहे ? उलट धर्मांतर केल्याबरोबर जर तेच लोक आपली मोजदाद माणसात करून आपल्याला समतेने वागवतात, तर धर्मांतर का करू नये हे मला कळत नाही." महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाचं वेळेस आंबेडकर म्हणाले होते की, अस्पृश्यांचा उद्धार समाजक्रांतीने जर होणार नसेल तर धर्मक्रांतीचा विचार मला करावा ' त्यांच्या या विचाराचे पडसाद त्यांच्या वृत्तपत्रांमध्ये व स्थापन केलेल्या संस्थामध्ये उमटले. 23 सप्टेंबर 1956 रोजी आंबेडकरांनी एक पत्रक काढून आपण नागपूर येथे विजयादशमीच्या दिवशी 14 नोव्हेंबर 1956 ला सकाळी 9 ते 11 या वेळेत बौद्ध धर्माची दीक्षा घेणार असल्याची घोषणा केली. डॉ. आंबेडकर यांच्या धर्मांतराच्या घोषणामुळे संपूर्ण देशात व देशाबाहेरून भरपूर प्रतिक्रिया आल्या.[11]

**धर्मांतराची कारणे:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लहानपणापासून हिंदु धर्मातील अस्पृश्यतेचे दुःख भोगले. केवळ अस्पृश्य म्हणून लहानपणी न्हावी त्यांचे केस कापत नसे! केवळ महार म्हणून पैसे देऊनही त्यांना बैलगाडीत बसायला मिळाले नाहीच हायस्कूलमध्ये 'संस्कृत' ही दुसरी भाषा शिकविण्याचे नाकारले गेले. त्यामुळे नाइलाजाने त्यांना पर्शियन शिकावे लागले. अशा अनेक घटनांचे त्यांच्या बालमनावर एकामागून एक आघात झाले. शेवटी परदेशांतून उच्च पदवी (एम्. ए. पीच्. डी.) संपादन करून आल्यावर बडोदे-सरकारच्या दरबारांत मोठे अधिकारी म्हणून ते नोकरीस राहिले असता त्यांच्या हाताखालील शिपाई 'विटाळ' होईल या भावनेने त्यांच्या टेबलावर उंचावरून कागद टाकीत असे. बडोद्यासारख्या शहरात केवल 'अस्पृश्य' म्हणून त्यांना राहण्यासाठी जागा मिळू शकली नाही. त्यातच कळस म्हणजे ज्या एका पारशी हॉटेलात डॉ. बाबासाहेब राहत होते, त्या हॉटेलवर सवर्ण हिंदूंनी दगड-काठ्यांनी हल्ला करून, तेथे त्यांना राहणे अशक्य केले. हॉटेल- मालकाने नुकसानीच्या भीतीने बाबासाहेबांना बाहेर काढले व त्यांनी बडोद्याला कायमचा 'राम राम' ठोकला. आणि तेव्हापासूनच त्यांच्या मनात धर्मांतराविषयीचे विचार येऊ लागले.[12]

**बौद्ध धर्माची दीक्षा:-**

अस्पृश्यांना शतकानुशतके नाकारले गेलेले माणुसकीचे हक्क, प्राप्त करून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांचा संघर्ष चालू होता. हिंदू धर्मात राहून हे हक्क मिळवण्याचा त्यानी सतत प्रयत्न केला. महाड, नाशिक येथील सत्याग्रह हे त्यासाठीच होते. दलितांना समतेची वागणूक मिळावी, त्यांची अस्मिता जागृत व्हावी हा त्या लढ्यामागचा उद्देश होता. मंदिर प्रवेशासारखे सत्याग्रह पारमार्थिक कारणासाठी नव्हतेच. ते समतेचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी होते. डॉ. आंबेडकरांनी दलित समाजास सांगितले होते की, "देवालयात प्रवेश मिळाला म्हणजे तुमचा उद्धार होईल असे नाही. देवालयातील मूर्तीभोवती खेळणाऱ्या पारमार्थिक भावापेक्षा पोटाची खळगी कशी भरतील याची तुम्ही अधिक काळजी घेतली पाहिजे. कारण दलित समाज दैन्यावस्थेत सापडलेला आहे. मिळालेल्या राजकीय हक्कांचा उपयोग जीवन अधिक समृद्ध करण्यासाठी केला पाहिजे." तसेच "मंदिर प्रवेशाची चळवळ अळवावरच्या पाण्यासारखी आहे. ती केव्हाच ओसरून जाईल. त्यामुळे सामाजिक दर्जा समानतेच्या पायावर मिळवायचा आहे. त्यासाठी आर्थिक गुलामगिरी नष्ट केली पाहिजे", खूप वर्षांच्या अव्याहत संघर्षांनंतर, हिंदू धर्मात राहून आपण दलिताचे हक्क त्यांना प्राप्त करून देऊ शकत नाही अशा निष्कर्षावर डॉ. बाबासाहेब आले, आणि त्यानंतर धर्मांतराच्या दिशेने त्यांचा विचार सुरू झाला. इ.स.1927 साली महाड सत्याग्रहाच्या वेळी डॉ. बाबासाहेब म्हणाले होते की, समाजक्रांतीने अस्पृश्योद्धार होणार नसेल तर धर्मक्रांतीचा विचार करावा लागेल. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा इ.स. 1935 साली येवले येथील परिषदेत केली.[13] त्या परिषदेत तीन ठराव झाले-

1) समता आणि स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी धर्मपरिवर्तन आवश्यक आहे.

2) ही परिषद डॉ. आंबेडकरांना असा विश्वास देत आहे की, महार जात सामुदायिकरीत्या धर्मांतरास सिद्ध आहे.

3) धर्मातराच्या दिशेने पहिले पाऊल म्हणून अ) हिंदू देव-देवतांची पूजा करणे सोडून देऊ. ब) हिंदूचे सण साजरे करणार नाही. क) हिंदू धर्ममंदिरात प्रवेश करणार नाही.

धर्मांतराचा निर्णय घेतल्यानंतर पुढील जवळजवळ एक तप कोणता धर्म स्वीकारायचा याचा विचार करीत होते, डॉ. बाबासाहेबांच्यावर जबाबदारी मोठी होती. कारण हे धर्मातर केवळ एका व्यक्तीचे होणार बव्हते. बाबासाहेबांबरोबर त्यांचे हजारो अनुयायी धर्मांतर करणार होते. बाबासाहेबांना समतेची शिकवण देणारा बुद्धिप्रामाण्यवादी धर्म हवा होता. अनेक वर्षांच्या विचारानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. बौद्ध धर्म हा भारतीय परंपरेतील धर्म असल्याने त्याचा स्वीकार करणे राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीनेही धोकादायक नव्हते. एका लेखात डॉ. आंबेडकरांनी म्हटले देखील आहे की, "बौद्ध धर्माचा पाया नैतिक आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही मानवी मूल्ये या धर्माने स्वीकारलेली आहेत. कर्मकांड, जातीभेद यांना बुद्धाने नकार दिलेला आहे." या काळातील त्यांच्या लेखातून, भापणातून हिंदू धर्माची परखड चिकित्सा आणि बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे वेगळेपण सातत्याने मांडले. डॉ. बाबासाहेबांच्या मते भगवान बुद्ध हे या देशातील पहिले समाजसुधारक होते. त्याचे तत्त्वज्ञान क्रांतिकारक होते.[14] म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 या दिवशी आपल्या अनुयायांसहित बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. आणि "मी यापुढे समतेचा प्रचार करण्यासाठी आयुष्य वेचेन" असा निश्चय केला. धर्मदिक्षा घेतल्यानंतर काठमांडू येथे त्यांनी "कार्ल मार्क्स की बुद्ध" या विषयावर भाषण केले. दुर्दैवाने ते त्यांचे अखेरचेच भाषण ठरले. त्यामध्ये त्यांनी आपल्या अनुयायांना अशी प्रतिज्ञा दिली की,

“जीवसृष्टी असीम आहे. ती भवसागरपार नेण्याची प्रतिज्ञा करूया.
आपणास असंख्य दोष आहेत, ते नष्ट करण्याची प्रतिज्ञा करूया.
अनंत सत्ये आहेत ती पूर्ण आकलन करण्याची प्रतिज्ञा करूया.
भगवान बुद्धांचा अतुल मार्ग संपूर्ण साध्य करण्याची प्रतिज्ञा करूया.”[15]

**निष्कर्ष:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौध्द धम्माचा स्वीकार करण्यामागे विषमतेवर आधारीत हिंदू धर्म व्यवस्थेचा धिक्कार करणे आणि आपल्या अस्पृश्य बांधवांची हिंदू धर्माच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता करणे हा उद्दात हेतू दिसून येतो. बौध्द धम्माचा स्वीकार करतानाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर तो आंधळेपणाने करताना दिसून येत नाहीत तर तत्पूर्वी ने

संपूर्ण धम्म तत्त्वांचा अभ्यास करून, त्याची इतर धर्माबरोबर तुलना करताना दिसतात. मानवी हक्कांची जोपासना करून मानवाचा व्यक्तीविकास घडून आला पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. व त्यासाठी त्यांना बौद्ध धम्म उपयुक्त वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषणमुक्त समाज जो समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मानवी मुल्यांवर आधारलेला असेल त्यासाठीच बौद्ध धम्माचा मार्ग स्वीकारलेला आहे. सर्व मनुष्यमात्रांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, मानसिक आणि नैतिक स्वातंत्र्य मिळवून देणे हा धर्माचा उद्देश असला पाहिजे. असा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर धरताना दिसून येतात व या सर्व गोष्टी केवळ बौद्ध धम्मामध्येच असल्याने संपूर्ण भारतच नव्हे तर जग धम्ममय झाले पाहिजे, संपूर्ण जगात धम्मराज्याची स्थापना झाली पाहिजे हे त्यांचे स्वप्न होते. आणि हे स्वप्न पूर्ण करण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. प्राचार्य गवळी टी. ए., प्रा. हिवराळे एस., डॉ. पी. ए.,प्रा. गव्हाणे एस. (संपादक) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ पृष्ठ क्र. 10.

2. डॉ.गायकवाड ज्ञानराज काशिनाथ, महामानव डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, रिया पब्लिकेशन कोल्हापूर जून 2006 पृष्ठ क्र. 25.

3. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. एप्रिल 1996 पृष्ठ क्र.12.

4. श.गो. देवगांवकर, राजकीय विचारवंत (पाश्चात्य आणि भारतीय), श्री साईनाथ प्रकाशन नागपूर जुलै 2007 पृष्ठ क्र. 124.

5. उपरोक्त डॉ. गायकवाड ज्ञानराज काशिनाथ, पृष्ठ क्र. 343.

6. शंकरराव खरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे. 15 मे 1990 पृष्ठ क्र. 62.

7. उपरोक्त शंकरराव खरात पृष्ठ क्र .64

8. तळवरकर, चिटणीस, रेगे (अनुवाद), भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म, पृष्ठ क्र. 23.

9. उपरोक्त, तळवळकर, चिटणीस, रेगे, पृष्ठ क्र.91

10. शंकरराव खरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार, इंद्रायणी साहित्य पुणे 26 जानेवारी 2009 पृष्ठ क्र. 126.

11. उपरोक्त शंकरराव खरात पृष्ठ क्र.130

12. .शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे. 11 ऑक्टोबर 1997. पृष्ठ क्र. 179.

13. उपरोक्त, डॉ. गायकवाड ज्ञानराज काशिनाथ पृष्ठ क्र. 321.

14. उपरोक्त, शंकरराव खरात पृष्ठ क्र.97.

15. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, चरित्र खंड चौथा, आवृत्ती तिसरी, सुगावा प्रकाशन, पुणे. 2003. पृष्ठ क्र.35.